सकाळ

# ‘अभियांत्रिकी पदविकाधारकांना अनेक संधी’

२०/०६/०५

पुणे, ता. १९ : अभियांत्रिकीची पदविका प्राप्त केल्यानंतर पुढे काय?... असंख्य पदविकाधारकांना भेडसावणाऱ्या या प्रश्नाला एक नव्हे तर अनेक उत्तरे आहेत.

पदविकाधारक विद्यार्थी अभियांत्रिकीच्या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो, 'एएमआयई''-आयईटीई' यांसारख्या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा देऊन अभियांत्रिकी समकक्ष पदवी मिळवू शकतो, आरटीओ-मर्चंट नेव्ही आदींसारख्या ठिकाणी करिअर करू शकतो, अगदी 'आयआयटी'त (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) बी. टेक. अभ्यासक्रमासाठी परीक्षा देऊ शकतो. याशिवाय शासकीय किंवा खासगी क्षेत्रात नोकरी करू शकतो आणि स्वतःचा व्यवसायही करू शकतो.

पदविकाधारकांना अशा विविध पर्यायांची माहिती आज जाहीरपणे दिली ती प्रा. विजय नवले यांनी. 'एम-पॉवर' या संस्थेने 'डिप्लोमानंतर पुढे काय?' हा खास कार्यक्रम टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या आवारात आयोजिला होता. त्याला पदविकाधारक आणि त्यांच्या पालकांनी मोठी गर्दी केली होती. 'सकाळ' या कार्यक्रमाचा माध्यम प्रायोजक होता.

दहावीनंतर तीन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर 'करिअर'साठी अनेक नवे मार्ग खुले होत असल्याचे प्रा. नवले यांनी सांगितले. तशा पंधरा-सोळा मार्गांची माहिती त्यांनी दिली. पुढील शिक्षणाच्या संधी आणि त्यासाठीच्या महाविद्यालयांची, तेथील प्रवेश प्रक्रियेची माहितीही त्यांनी दिली. मुख्य व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

अश्विनी वाघ यांनी स्वागत केले. वसंत नारके यांनी आभार मानले.

---

७/७/०६ दै. सकाळ (कॅम्पस)

४ / पुणे, शुक्रवार, ७ जुलै २००६

हॅपनिंग्ज @ कॅम्पस

## एम-पॉवरतर्फे व्याख्यान

एम-पॉवरतर्फे नुकतेच करिअर मार्गदर्शक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रा. विजय नवले यांनी डिप्लोमानंतरच्या संधींविषयक उपस्थितांना मार्गदर्शन केले. चिदंबरम इन्स्टिट्यूट (चेन्नई) येथील मोहन मुरली यांनी मर्चंट नेव्हीमधील उपयुक्त प्रशिक्षणासंदर्भात माहिती दिली. 'फेडरेशन ऑफ ऑटोमोटिव्ह असोसिएशन'चे श्री. आघारकर यांनीही ऑटोमोबाईल क्षेत्रातील नवीन संधींबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

---

३०/६/०६

## ‘डिप्लोमानंतर पुढे काय?’ याविषयी आज व्याख्यान

पुणे, ता. २९ : अभियांत्रिकीची पदविका घेतलेल्या, हा अभ्यासक्रम करू इच्छिणाऱ्या किंवा करीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एम-पॉवर या संस्थेतर्फे 'डिप्लोमानंतर पुढे काय?' या विषयावर उद्या व्याख्यान आयोजिले आहे. डिप्लोमानंतरच्या करिअर संधींची माहिती यामध्ये देण्यात येणार आहे. प्रा. विजय नवले मार्गदर्शन करतील. भरत नाट्य मंदिर येथे सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होणार असून, प्रवेश विनामूल्य आहे.

(सकाळ)